गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

Titie code MAHMAR 52037

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १३५ ● मंगळवार १६ मे २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 135 | Date : 16/05/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## पंढरपूर वारकऱ्यांसाठी एसटी महामंडळ ५ हजार बसेस सोडणार



मुंबई : आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेकरिता वारकऱ्यांसाठी एसटी महामंडळाने राज्यभरातून ५००० विशेष गाड्या सोडण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २५ जून ते ५ जुलै या दरम्यान या विशेष गाड्या धावणार असून वाखरी येथील माऊलींच्या रिंगण सोहळ्यासाठी (२७ जुन रोजी) २०० अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पंढरपूर आषाढी यात्रेसाठी एसटी ने बससेवेसाठी केलेल्या नियोजनाचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांच्यासह महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते. पंढरपूर आषाढी यात्रा हा महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेचा जिव्हाळ्याचा विषय आहे. यामध्ये एसटीच्या प्रवाशी वाहतुकीला अनन्य साधारण महत्व आहे. याकाळात एसटीकडून आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा प्रवाशांना वारकऱ्यांना दिल्या जाव्यात. भाविक-प्रवाशांना त्यांच्या गावापासून थेट पंढरपूर पर्यंत घेऊन जाणे तसेच विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर सुखरूपपणे घरी आणून सोडण्याची महत्वपूर्ण जबाबदारी एसटीवर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

आषाढी यात्रेसाठी मुंबईसह, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या सहा प्रदेशातून गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रेसाठी सुमारे ५००० गाड्या सोडण्याचे नियोजन एसटीतर्फे करण्यात आले आहे. । पान २ वर

### चार तात्पुर्ती बस स्थानके उभारणार

**पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून बसेस सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान,यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक अशा विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येणार आहेत.**

## रखडलेल्या महापालिका निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होऊ शकतात

पुणे : राज्यातील रखडलेल्या महापालिका निवडणुका या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होऊ शकतात असं महत्त्वपूर्ण वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. पुणे भाजपचे शहराध्यक्ष जगदिश मुळीक यांच्या एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. हा प्रश्न सध्या न्यायालयात असल्याने देवेंद्र फडणीसांनी केलेल्या या वक्तव्यावरुन राज्य शासनाही भूमिकाही काहीशी स्पष्ट होतेय असं म्हटलं जातंय. गेल्या दीड वर्षांपासून महापालिका निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. त्या ठिकाणी प्रशासक नेमण्यात आले आहेत.

मुंबई महापालिका वॉर्ड पुनर्रचना प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर या आठवड्यात सुनावणीची शक्यता आहे. हायकोर्टाने शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक राजू पेडणेकर आणि समीर देसाई यांची याचिका फेटाळल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिकेच्या वॉर्डची संख्या राज्य सरकारने२३६ वरून २२७ केल्याने शिवसेना ठाकरे हायकोर्टात याचिका दाखल केली होती. राज्यातील अनेक नगर परिषदांमध्ये नगरसेवकांची संख्या



वाढवलेली कायम ठेवलेली असताना फक्त मुंबई । पान २ वर

## परीक्षांचा निकाल जाहीर करण्यास विलंब झाल्यास कुलगुरुंना धरणार जबाबदार; राज्यपाल रमेश बैस यांचा इशारा

मुंबई : राज्यपाल रमेश बैस यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी परीक्षांचा निकाल जाहीर करण्यास विद्यापीठ विलंब करत असल्याच्या स्थितीवर राज्यपालांनी कुलगुरुंना चांगलंच ठणकावलं आहे. कोणत्याही परीक्षेचा निकाल लावण्यास विलंब झाल्यास थेट कुलगुरुंना जबाबदार धरलं जाईल, अशी तंबी राज्यपाल रमेश बैस यांनी राज्यातील कुलगुरुंना दिली आहे.



विद्यापीठांच्या विविध परीक्षांचे निकाल ३० दिवसांत आणि उशिरात उशिरा ४५ दिवसांच्या आत लावण्याचे बंधन असताना देखील बहुसंख्य विद्यापीठं निकाल लावण्यास अक्षम्य विलंब करत आहेत, असे निरीक्षण राज्यपालांनी नोंदवले. विद्यापीठांच्या निकालासोबत विद्यार्थ्यांचे भवितव्य निगडीत असल्याने सर्व विद्यापीठांनी हा विषय अतिशय गांभीर्याने घेणं आवश्यक असल्याचं राज्यपालांनी म्हटलं. राज्यपाल आणि विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील काही पारंपरिक, कृषी, आरोग्य विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक सोमवारी राजभवनावर पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. आगामी २०२३-२४ शैक्षणिक सत्रापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात विद्यापीठांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली होती. तसेच,। पान २ वर

## मागील तीन महिन्यांत महाराष्ट्रातून तीन हजारांहून अधिक मुली बेपत्ता

### महिला आयोगाने राज्य सरकारला विचारला जाब

मुंबई : महाराष्ट्रातून गेल्या तीन महिन्यात १६ ते २५ वयोगटातील ३ हजार ५९४ तरुणी राज्यातून बेपत्ता झाल्या आहेत. राज्य सरकारच्या वेबसाईटवर असलेली महिला आणि मुली बेपत्ता होण्याची आकडेवारी चिंताजनक आहे, असं म्हणत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर (ठींरिश्रळ उहरज्ञरपज्ञरी) यांनी प्रशासनाला जाब विचारला आहे. महिलांच्या तपासासाठी गृह विभागाने स्वतंत्र समिती स्थापन करावी आणि शोध मोहिम राबवावी, दर १५ दिवसांनी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य महिला आयोगास सादर करण्यात यावा, अशी सूचना राज्य महिला



आयोगाने गृह विभागाला केली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ही माहिती पत्रकार परिषदेत दिली.

राज्य सरकारने हरवलेल्या मुली आणि महिलांचा शोध घेण्यासाठी शक्य तितकी तत्परता दाखवावी, अशी विनंती रुपाली चाकणकर यांनी केली आहे. पाहिजे तशी तत्परता राज्य सरकारकडून दाखवली जात नसल्याचंही त्या म्हणाल्या. राज्य सरकारच्या कार्यशैलीवर प्रश्न उपस्थित करत नाहीत, मात्र या प्रकरणात ज्या तत्परतेने काम व्हायला हवं होतं ते होताना दिसत नाही, असं राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर म्हणाल्या आहेत.

मुंबईतून सर्वाधिक मुली आणि महिला बेपत्ता होत असल्याचंही रुपाली चाकणकर । पान २ वर

## ..तर अपात्रतेसंदर्भात निर्णय घेण्यास विलंब होईल

### लंडनहून परतताच विधानसभा अध्यक्षांचं मोठं विधान

मुंबई :सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर निर्णय दिला आहे. न्यायालयाने शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांना दिला आहे. राहुल नार्वेकर हे लंडन दौऱ्यावर गेले होते. ते लंडन दौऱ्यावरून नुकतेच मुंबई विमानतळावर दाखल झाले. यावेळी विमानतळावर



प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना नार्वेकरांनी अपात्रतेच्या निर्णयाबद्दल मोठं विधान केलं आहे. यावेळी राहुल नार्वेकर म्हणाले, १६ आमदारांच्या अपात्रतेबद्दल ज्याकाही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्याचा आमचा प्रयत्न असेल. ही एक मोठी प्रक्रिया आहे. यामध्ये सर्वप्रथम राजकीय पार्टी कुणाची आहे? याचा निर्णय होणं आवश्यक आहे. संपूर्ण तपास पूर्ण झाल्यानंतरच हा निर्णय घेण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्यामुळे घटनेतील सर्व तरतुदींचा विचार करूनच योग्य निर्णय घेऊविधानसभा। पान २ वर

# अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपदी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील तर उपसभापती पदी अप्पासाहेब पाटील यांची निवड

## कारखाना असो वा दोन्ही बाजार समितीच्या विकासासाठी कटीबद्ध : आ. सचिन कल्याणशेट्टी





अक्कलकोट/विशेष प्रतिनिधी : अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदी भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील तर उपसभापती पदी कृषीतज्ञ अप्पासाहेब पाटील यांची निवड करण्यात आली आहे. निवड जाहीर होताच कार्येकर्त्यांनी एकच जल्लोष करीत गुलालचे उधळण करीत फटकाचे आतषबाजी केली.

दरम्यान सभापती पदाकरिता सिद्रामप्पा पाटील यांचा एकमेव अर्ज आला होता. तर उपसभापती पदाकरिता सत्ताधारी गटाचे अप्पासाहेब पाटील व बसवराज माशाळे तर विरोधी गटाचे कार्तिक पाटील या तिघांचे अर्ज आले.

यामध्ये सत्ताधारी गटाचे बसवराज माशाळे हे व्यापारी मतदारसंघातून असल्याने या गटाला उपसभापती पदाकरिता निवडणूक लढविता येत नसल्याने सदरचा अर्ज अवैध ठरले. कार्तिक पाटील व अप्पासाहेब पाटील यांच्यामध्ये मतदान होवून यामध्ये अप्पासाहेब पाटील यांना १२ तर कार्तिक पाटील यांना ६ मते मिळाली. यामध्ये अप्पासाहेब पाटील यांचा विजय झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी ए.जी.झालटे यांनी जाहीर केले. यावेळी सहा.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सिध्देश्वर कुंभार यांनी काम पाहिले.

सत्कारापूर्वी श्री स्वामी समर्थ व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

नूतन पदाधिकारी यांचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील व उपसभापती अप्पासाहेब पाटील यांचा शाल, श्रीफळ, हार, गुच्छ देऊन सत्कार केले.

**सभापती पद दुसर्यांदा :** याअगोदार सहकारतपस्वी सिद्रामप्पा पाटील हे दि. २७ जानेवारी १९८२ ते दि.२६ जानेवारी १९८७ या सालात अक्कलकोट बाजार समितीचे सभापती पद पाच वर्षे त्यांच्याकडेच होते. तब्बल ३६ वर्षांनी पुनश्च सभापती पदाची संधी मिळाली आहे. १९८७ चा काही काळ वगळता बाजार समितीवर सिद्रामप्पा पाटील यांची सत्ता होती व आजही ती कायम आहे.

**८५ वर्षाचे अप्पा आणि जिद्द :** आजही सिद्रामप्पा पाटील हे वयाची तमा न बाळगता तालुक्याच्या हितार्थ शेतकर्यांसाठी सतत धडपड सुरु असून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ५० वर्षे संचालक, ३५ वर्षे जि.प.सदस्य, पंचायत समितीचे सभापती, जि.प.विषय समितीचे सभापती, आमदार, स्वामी समर्थ कारखाना गेल्या २५ वर्षापासून अबाधित वर्चस्व, तालुका खरेदी-विक्री संघ, सहकारी संस्थेवर वर्चस्व कायम.

**पाटील घराण्याला तिसऱ्यादा संधी** अक्कलकोट बाजार समितीवर सिद्रामप्पा पाटील यांना दुसर्यांदा तर त्यांचे सुपूत्र संजीवकुमार पाटील हे देखील बाजार समितीचे २०१६ ते २०२२ पर्यंत सभापती पदावर कार्यरत होते. वडिल आणि मुलगा यांचे अदलाबदल झालेले आहे. संजीवकुमार पाटील हे साखर कारखान्याचे चेअरमन पदाची धुरा हाती घेतली आहे. यापूर्वी दिलीपराव पाटील हे बाजार समितीचे संचालक म्हणून कार्यरत होते.

**अप्पासाहेब पाटील यांना दुसऱ्यादा संधी** यापुर्वी बाजार समिती २०१७ ते २०२२ पर्यंत उपसभापती पदावर कार्यरत होते. त्यावेळी सभापती हे संजीवकुमार पाटील हे होते. आता सिद्रामप्पा पाटील हे आहेत.

**कार्याचे फलित** सिद्रामप्पा पाटील यांनी साखर कारखाना, बाजार समिती यावर अनेकांना कार्य करण्याची संधी दिली. अनेकांना विविध संस्थेवर पदे मिळवून दिली. चपळगाव भागात साखर कारखान्याचे उपाध्यक्ष पद याबरोबर बाजार समितीचे पद देखील दिलेले असून शेतकर्यांकरिता जोमाने कार्य करण्याची संधी सिद्रामप्पा पाटील यांनी दिली आहे. हे माझ्या कार्याचे फलित आहे, शेतकर्यांचे आशिर्वाद आहे.- **अप्पासाहेब पाटील, नूतन उपसभापती अक्कलकोट**

### बसवेश्वर मार्केट यार्डाचे उद्घाटन

यापूर्वी बाजार समिती ही जुन्या अडत बाजारात होती. सिद्रामप्पा पाटील यांच्या १९८२ ते १९८७ या काळात बागेहळ्ळी रोडवरील ३३ एकर जागेत एकाच ठिकाणी व्यवसाय व प्रक्रिया युनिट मंजूरी मिळविणारे महाराष्ट्रातील त्याकाळात पहिली बाजार समिती ठरली होती. त्यावेळी ४ मे १९८४ रोजी त्याकाळचे पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास राज्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले होते.

याप्रसंगी स्वामी समर्थ सह.साखर कारखाना, अक्कलकोट व दुधनी बाजार समितीच्या नूतन संचालक सत्कार करण्यात आला.

सदरच्या निवडी होताच श्री बसवेश्वर मार्केट यार्डाच्या प्रशासन भवनातून मिरवणुकीने गोदाम येथे सभेत रुपांतर होवून त्या ठिकाणी सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले, अक्कलकोट व दुधनी बाजार समिती निवडणूकीची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात झाली. या निवडणुकीच्या माध्यमातून शेतकर्यांनी दिलेले उत्तर आहे. अप्पांच्या नेतृत्वाखाली सहकारात यापुढे देखील कार्यरत राहू. कारखाना असो वा दोन्ही बाजार समितीच्या विकासासाठी कटीबद्द असल्याचे सांगून झालेल्या निवडणुकी बाबत विश्लेषात्मक माहिती आ.कल्याणशेट्टी यांनी सांगितली.

माजी आमदार सिद्रामप्पा पाटील । पान २ वर

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



*** सुविचार ***

चांगला वक्ता हा जातिवंत वीर असतो.

# महाविकास आघाडीच्या जागा वाटपाचा तिढा कसा सुटणार?

कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयानंतर राज्यातील महाविकास आघाडीलाही पुन्हा बळ प्राप्त झाले आहे. कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयामुळे आता देशातील परिस्थिती बदलू शकते, असा विश्वास महाविकास आघाडीला वाटू लागला आहे. आधी शरद पवार यांनी उद्धव ठाकरेंवर केलेली टीका, त्यानंतर संजय राऊत यांनी केलेल्या विधानांमुळे आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता वाटत असतानाच पुन्हा एकदा शरद पवारांनी परिस्थितीचे नियंत्रण घेत महाविकास आघाडीची बैठक बोलावली.बैठकीत काय ठरले? : महाविकास आघाडीच्या या बैठकीत आघाडीची वज्रमूठ ढिली होणार नाही याकडे सर्वांनी एकजुटीने लक्ष दिले पाहिजे. तसेच आगामी काळात एक मताने काम करून भाजपचा पराभव केला पाहिजे, असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. पवारांच्या या मताला सर्वांनीच दुजोरा दिला आहे. सध्याची परिस्थिती ही महाविकास आघाडीसाठी उत्तम असून, त्यामुळे लवकरच जागा वाटपाच्या बाबतीत चर्चा सुरू करायला पाहिजे, असे या बैठकीत ठरले आहे.

महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर आता लवकरच जागा वाटपाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. कोणतीही अडचण न येता आघाडीतील घटक पक्षांदरम्यान योग्य जागावाटप केले जाईल. त्यासाठी आम्ही लवकरच बैठक घेणार आहोत. आगामी लोकसभा निवडणुका ह्या मार्च महिन्यात असतील, या निवडणुकांसोबतच राज्यातील विधानसभेच्या निवडणुका लागण्याची देखील शक्यता आहे. त्यामुळे जागा वाटपावर लगेचच चर्चा करून त्यानुसार कामाला सुरुवात करावी लागेल – अजित पवार, विरोधी पक्ष नेते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये जरी कुठे आघाडी म्हणून आम्ही लढलो नसलो तरी यापुढे येणाऱ्या विधान परिषद, विधानसभा आणि लोकसभा या सर्वच निवडणुका आघाडी म्हणून संयुक्तरित्या लढणार आहोत. वास्तविक जागा वाटपाचा मुद्दा आता आमच्यासाठी गौण आहे कारण अजून निवडणुकीला बराच वेळ आहे. तोपर्यंत काही उमेदवार इकडून तिकडे जाऊ शकतात किंवा अन्य पक्षातून काही प्रबळ उमेदवार आमच्याकडे



येऊ शकतात. त्यामुळे सध्या तरी त्या विषयावर आम्ही चर्चा न करता आघाडीची वज्रमूठ अधिक कशी घट्ट होईल, यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. – सचिन अहिर, आमदार

काय असू शकतो जागा वाटपाचा फॉर्म्युला? : महाविकास आघाडीमध्ये तीन महत्त्वाचे पक्ष आहेत. यापैकी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाकडे सध्या १६ आमदार आहेत. राष्ट्रवादीकडे ५४ तर काँग्रेसकडे ४४ आमदार आहेत. त्यासोबतच काही अपक्ष आमदारही आहेत. या सर्वांची मिळून बेरीज ११४ होते आहे. २०१९ च्या निवडणुका लढताना काँग्रेस आणि राष्ट्रवादीने ज्या पद्धतीने जागावाटप केले होते, त्याच सूत्राच्या आधारे आता पुन्हा जागावाटप होऊ शकते. यामध्ये सध्या ज्या पक्षाने ज्या जागा जिंकल्या आहेत त्या जागा त्यांना दिल्या जाण्याची शक्यता आहे. त्यानुसार २८८ पैकी ११४ जागांचे वाटप स्पष्टपणे होईल. त्यानंतर ज्या जागांवर शिवसेनेचे ४० आमदार निवडून आले होते, त्या जागा शिवसेनेला दिल्या जातील. यानुसार १५४ जागांचे वाटप केल्यानंतर उर्वरित जागांवर ज्या ठिकाणी ज्या पक्षाचा उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होता त्या पक्षाकडे ती जागा सोपवल्यास जागा वाटपाचा तिढा सुटू शकतो. मात्र त्याबाबत अद्याप प्राथमिक चर्चा सुरू असून यासाठी लवकरच समिती नेमण्यात येणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. सहा नेत्यांची समिती जागा वाटपाबाबत चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.काँग्रेस राष्ट्रवादीच्या जागा वाटपाचा इतिहास : काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने २००४ मध्ये निवडणूक पूर्व आघाडी केली होती. त्यावेळी जागा वाटपामध्ये काँग्रेसच्या वाट्याला १५७ तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला १२४ जागा आल्या होत्या. तत्पूर्वी सत्तेत असलेल्या काँग्रेसकडे ७५ आणि राष्ट्रवादीकडे ५८ जागा होत्या. त्या जागांच्या आधारे हे जागा वाटप करण्यात आले होते. मात्र निवडणुकीत काँग्रेसने ६९ तर राष्ट्रवादीने ७१ जागा जिंकल्या.

२००९ मध्ये राष्ट्रवादीचे पारडे जड : २००४ मधील यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने निम्म्या निम्म्या जागा लढवण्याची मागणी केली. अखेरीस जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरत राष्ट्रवादी काँग्रेसने ११४ आणि काँग्रेसने १७४ जागा लढवल्या. मात्र त्यामुळे या निवडणुकीत काँग्रेसच्या जागांमध्ये वाढ होऊन काँग्रेसने ८२ तर राष्ट्रवादीने ६२ जागांवर विजय मिळवला. २०१४ मध्ये लोकसभेत वाताहत झालेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीने विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला. मात्र यावेळी काँग्रेसच्या वाट्याला ४२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त ४१ जागा जिंकता आल्या.

कोणाकडे किती आमदारकसा असेल लोकसभेसाठीचा फॉर्म्युला? : महाविकास आघाडीत लोकसभेसाठी प्राथमिक स्तरावर चर्चा झाल्याची माहिती समोर येते आहे. यामध्ये एकूण ४८ जागांपैकी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना २१ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस १९ जागा आणि काँग्रेसने ८ जागा लढवाव्या अशी प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये मुंबईतील लोकसभेच्या ६ जागांपैकी ४ जागा या ठाकरे गटाला तर उरलेली प्रत्येकी एक जागा काँग्रेस आणि राष्ट्रवादीने लढवावी, अशी चर्चा झाल्याची माहिती मिळते आहे. त्यामुळे महाविकास आघाडी टिकावी आणि जागावाटप योग्य रीतीने व्हावे यासाठी सर्व घटक पक्ष प्रयत्न करीत असल्याचे चित्र सध्या दिसते आहे.

## संपादकीय

## यावर उपाय होतील का ..

देशामध्ये द केरला स्टोरी या चित्रपटाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे ते प्रकरण म्हणजे मुली बेपत्ता होणे आणि त्यांचं पुढे काय होते याकडे. केरळ राज्यात ३२ हजार तरुणींचे धर्मांतर करण्यात आले आहे. या दाव्यामुळेच हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ३२ हजारांच्या आकड्याला आधार काय, असा प्रश्न एकीकडे विचारला जात असताना दुसरीकडे महाराष्ट्रातून केवळ एकाच महिन्यात म्हणजे मार्च महिन्यात तब्बल २२०० मुली बेपत्ता झाल्याची अधिकृत बाब पुढे आली आहे. त्याआधी फेब्रुवारी महिन्यात ही संख्या १८१० इतकी होती. त्यामुळे एकाच महिन्यात बेपत्ता होणाऱ्या मुलींच्या संख्येत ३९० ने वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे बेपत्ता झालेल्या मुलींमध्ये अल्पवयीन मुलींच्या आकडेवारीचा समावेश नाही. त्या मुलींची ओळख जाहीर केली जात नाही. त्यांची नोंद अपहरणाच्या केसमध्ये केली जाते, तर अठरा वर्षांवरील मुली आणि महिला बेपत्ता झाल्यास, तशी तक्रार आल्यास पोलिसामध्ये त्याची नोंद केली जाते. मुलींना फूस लावून पळवणे, लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेणे, मुलींना वाईट मार्गाला लावणे, नोकरीचे आमिष दाखवून शोषण करणे अशा घटनांमुळे महिलांच्या, तरुणींच्या सुरक्षेचा मुद्दा गंभीर बनला आहे. २०२२ ची मार्च महिन्यातील आकडेवारी पाहिली तर पोलीस रेकॉर्डवरील १ हजार ६९५ मुलींचा अद्याप शोध लागू शकलेला नाही. मग या मुलींचे काय झाले, असा प्रश्न मनी येतो. महत्त्वाचे म्हणजे शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण जास्त असल्याचे समोर आले आहे. पूर्वी एकत्र असताना घरातील सर्व सदस्यांच्या गप्पाटप्पा होत, पण आता जेव्हा घरात सदस्य एकत्र असतात तेव्हा प्रत्येकजण मोबाइलमध्ये घुसलेला असतो. मुला-मुलींबरोबर पालकही मोबाइलच्या आहारी गेलेले दिसतात. त्यामुळे पालकांचा मुलांसोबतचा संवाद कमी होत आहे. अशा वेळी मुली प्रेमाचा आधार शोधण्यासाठी चुकीचे खांदे निवडतात. बेपत्ता झालेल्या मुलींच्या तपासाचे काम ज्या पोलीस व्यवस्थेकडे आहे, त्यांच्याकडून ते अपेक्षेप्रमाणे होत नाही. काही प्रकरणात घरी परतलेल्या तरुणींची नोंद होत नाही. पोलिसांना प्रामाणिकपणे तपास करायचा असतो, परंतु पुढारी आपल्या राजकीय वजनाचा वापर करून पोलिसांवर दबाव आणतात. त्यात जो ऐकणार नाही, त्याच्या बदलीमागे ही मंडळी लागतात. एकदा तपासी अधिकाऱ्याची बदली झाली की, प्रकरण धूळखात पडते. पोलीस विभागातील अतिशय अपुरे मनुष्यबळही तपासाच्या विलंबास कारणीभूत ठरते. पुरेसे मनुष्यबळ असल्यास हरवलेल्या मुलींचा शोध घेण्यासाठी मोठी टीम तयार करता येईल.

पान १ वरुन

## पंढरपूर वारकऱ्यांसाठी एसटी ...

छत्रपती संभाजीनगर भागातून १२००, मुंबई ५००, नागपूर १००, पुणे १२००, नाशिक १००० तर अमरावती येथून ७०० विशेष गाड्यांचे नियोजन पंढरपूरसाठी करण्यात आले आहे.

दरम्यान, यंदा जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी देहूतून १० जूनला पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. २८ जून रोजी संत तुकारामांची पालखी पंढरीत दाखल होणार आहे. तर आषाढी एकादशीच्या सोहळ्यात २९ जूनला तुकोबांची पालखी सहभाग घेणार आहे. अन प्रत्यक्षात याच दिवशी तुकोबा आणि विठुरायाची भेट घडणार आहे. तर, संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी ११ जूनला आळंदीमधून प्रस्थान करेल. तर पायी प्रवास करून २८ जूनला पालखी पंढरपूरमध्ये पोहचेल आणि २९ जूनला संत ज्ञानेश्वर माऊलींची विठुरायाशी भेट घडेल.

## अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती .

म्हणाले, ८५ व्या वर्षी सभापती का झालो याबाबतची माहिती सांगून अक्कलकोट बाजार समिती, साखर कारखाना या अगोदर झालेल्या दुधनी बाजार समिती निवडणुकीबाबतची माहिती व जडणघडण सांगून विरोधकांचा खरपूस समाचार घेतले. यापुढील काळात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगून जिल्हातच नव्हे तर राज्यात अक्कलकोट व दुधनी बाजार समिती व कारखाना नावलौकिक मिळावे असे कार्य करू असे यावेळी पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी साखर कारखान्याचे नूतन अध्यक्ष संजीवकुमार पाटील यांनी झालेल्या निवडणुकीबाबतची माहिती देवून आगामी काळात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासोबत राहून काम करणार असल्याचे सांगून तीनही संस्था प्रगतीपथावर नेवू अशी ग्वाही दिली. यावेळी महेश हिंडोळे व सोपान निकते यांनी कारखाना निवडणुकीबरोबर दोन्ही बाजार समिती निवडणुकीची माहिती राबविलेले उपक्रम याबाबत उत्कृष्ट विवेचन केले. या कार्यक्रमात आडत व्यापारी असोसिएशनचे नूतन अध्यक्ष बसवराज घिवारे, उपाध्यक्ष संतोष भंडारे, सचिव मुसा बागवान यांचा तसेच साखर कारखाना, दोनही बाजार समितीच्या नूतन संचालकांचा देखील सत्कार यावेळी करण्यात आला.

याप्रसंगी अक्कलकोट बाजार समितीचे नूतन संचालक करपे बाबूराव सिध्दप्पा, बाके कामगोंडा संगनबसप्पा, बिराजदार धनराज चंद्रकांत, बिराजदार शिवमंगल धोंडप्पा, स्वामी पार्वतीबाई इरय्या, कुंभार प्रकाश भिमराव, बंदीछोडे राजेंद्र धुळप्पा, घिवारे श्रीशैल स्वामीराव, माशाळे बसवराज शंकर व दुधनी बाजार समितीचे नूतन सभापती अप्पू परमशेट्टी, उपसभापती सिध्दाराम बाके, संचालक मोतीराम राठोड, विश्वनाथ इटेनवरू, सुवर्णा मचाले, अस्विनी सालेगाव, बहिदपाशा शेख, निगणा पुजारी, सिद्धाराम तोळणूरे, देवेंद्र बिराजदार आदीजण उपस्थित होते.

यावेळी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विश्वनाथ भरमशेट्टी, मल्लिकार्जुन कारले, रमेश कौटगी, भालचंद्र मोरे, संजय याबाजी, दिलीप शावरी, देवेंद्र बिराजदार, श्रीमंत कुंटोजी, निजामोद्दीन बिराजदार, सोपान निकते, उत्तम वाघमोडे, उमेश पाटील, महेश पाटील, संजय बाणेगाव, सुधीर मचाले, अभिजित पाटील, सुरेश झळकी, प्रकाश किलजे, चंद्रशेखर बडदाळे, प्रकाश हिप्परगी, विवेकानंद उंबरजे, धोंडप्पा पोमाजी, शिवपुत्र विजापुरे, सुभाष धुळखेडे, अमर रमेश पाटील, मल्लिनाथ पाटील, आदर्श पाटील, कांतु धनशेट्टी, पैगंदर नदाफ, दरेप्पा अरवत, कलप्पा हंगरगी, विवेक ईश्वरकट्टी, प्रभाकर दिंडूरे, शिवमूर्ती विजापुरे, रविंद्र बगले, विठ्ठल यमाजी, डॉ.शरणु काळे, पिरोजी शिंगाडे, मोहन दुलंगे, महेश पाटील, शरणु मसुती, अशोक वर्दे, सोमनाथ पाटील, शंकर उण्दे, संतोष भंडारे, उमाकांत शटगार, संतोष माशाळे, गिरमल गंगोंडा यांच्यासह साखर कारखाना संचालक, सोसायटी चेअरमन, संचालक, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचलन आणि आभार मल्लिनाथ दुलंगे यांनी मानले.

## रखडलेल्या महापालिका निवडणुका..

महापालिकेतील नगरसेवकांची संख्या कमी करण्याचा राज्य सरकारचा निर्णय दुजाभाव करणारा असल्याचा शिवसेना ठाकरे गटाचा आरोप आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील वाद हा सर्वोच्च न्यायालयात असून त्याची सुनावणी सातत्याने लांबणीवर जात आहे. या प्रकरणावरील शेवटचा निर्णय सुप्रीम कोर्टाने यापूर्वी २८ जुलै २०२२ रोजी दिला होता. याच सुनावणीत सुप्रीम कोर्टाने ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला परवानगी देण्यात आली होती. पण त्यानंतर ९२ नगरपरिषदांचा प्रश्न कोर्टात प्रलंबित होता. त्यानंतर राज्यात सत्तांतर झालं. नवं सरकार स्थापन झाल्यानंतर ४ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणुका आणि प्रभाग रचना यासंदर्भातील नवा अध्यादेश काढण्यात आला, त्यानंतर हा मुद्दा सुप्रीम कोर्टात पोहोचला.

मे महिन्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची सूचना केली होती. कुठल्याही परिस्थितीत निवडणुका घ्या, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं होतं. परंतु त्यानंतर राज्यात सत्तांतर झालं आणि शिंदे-फडणवीस सरकारने वॉर्ड रचना पुन्हा नव्याने करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या.

महाविकास आघाडी सरकारने मुंबई महानगरपालिकेमध्ये एक सदस्यीय प्रभाग आणि इतर महापालिकांमध्ये तीन सदस्यांचा प्रभाग केला होता. त्यानंतर शिंदे सरकारने २०१७ प्रमाणे चारचा प्रभाग करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला महाविकास आघाडीने जोरदार विरोध केला होता.

## परीक्षांचा निकाल जाहीर ..

विद्यापीठांशी निगडित सामायिक विषयांवर चर्चा करण्यासाठी बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. याच विषयावर राज्यातील उर्वरित विद्यापीठांची दुसरी बैठक नागपूरमध्ये घेणार असल्याचं राज्यपालांनी सांगितलं. नवे शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी अवघ्या एक ते दोन महिन्यांचा अवधी शिल्लक आहे. धोरणाच्या उत्तम अंमलबजावणीबाबत महाराष्ट्राने देशापुढे उदाहरण सादर करावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली. विविध परीक्षांचे निकाल वेळेवर न लागल्यामुळे पुढचे शैक्षणिक वेळापत्रक चुकते, अशी खंत राज्यपालांनी व्यक्त केली. त्यामुळे निकाल वेळेवर लावले पाहिजे, तसेच गुणपत्रिकांचे वितरण देखील वेळेवर झाले पाहिजे, असं राज्यपालांनी सांगितलं.

अनेकदा इतर विद्यापीठांमध्ये किंवा परदेशी विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेची किंवा तात्पुरत्या पदवी प्रमाणपत्राची गरज असते. विद्यापीठाकडून प्रतिसाद न मिळाल्याने विद्यार्थी विद्यापीठास पत्र लिहितात, अशा विद्यार्थ्यांच्या समस्येकडे विद्यापीठांनी संवेदनशीलतेनं पहावं, असं राज्यपालांनी सांगितलं. काही दिवसांपूर्वी २०० विद्यार्थ्यांना एका विषयात चुकून शून्य गुण मिळाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. अशा चुका टाळल्या पाहिजे आणि चूक झाल्यास विद्यार्थ्यांना त्वरित दिलासा दिला पाहिजे, असं राज्यपालांनी ठणकावून सांगितलं.

## मागील तीन महिन्यांत महाराष्ट्रातून ..

म्हणाल्या. १ जानेवारी ते ३१ मार्च दरम्यान राज्यातील ३ हजार ५९४ महिला हरवल्या आहेत, यातील काहींचा शोध लागला असला तरी एकंदरीतच ही गंभीर बाब असल्याचं मत महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केलं आहे. नोकरी, लग्न, प्रेमाचं आमिष दाखवून मुलींची दिशाभूल करुन त्यांचं लैंगिक शोषण केलं जात असल्याचंही समोर आलं आहे. राजकारण सोडून राज्य सरकारने आधी मुली बेपत्ता होण्याच्या प्रकरणाकडे लक्ष द्यावं, असं रुपाली चाकणकर यांनी म्हटलं आहे. मुली बेपत्ता होण्याचा आकडा प्रचंड वाढत असल्याचं त्या म्हणाल्या.

**बेपत्ता तरुणींची जिल्हानिहाय आकडेवारी** अहमदनगर १८४, अकोला ४१, अमरावती शहर ३१, अमरावती ग्रामीण ६३, औरंगाबाद शहर ६६, औरंगाबाद ग्रामीण ५२, बीड २७, भंडार २३, मुंबई शहर ३८३, बुलढाणा ७६, चंद्रपूर १०१, धुळे ४५, गडचिरोली १३, गोंदिया ४६, हिंगोली १४, जळगाव १२१, जालना ३६, कोल्हापूर १२७, लातूर ४२, मीरा-भाईंदर ११३, नागपूर शहर १०८, नागपूर ग्रामीण १६९, नांदेड ३६, नंदुरबार ३७, नाशिक शहर ९३, नाशिक ग्रामीण १६९, नवी मुंबई ७५, उस्मानाबाद ३४, पालघर २८, परभणी २७, पिंपरी चिंचवड १४३, पुणे शहर १४८ आणि पुणे ग्रामीण १५६ अशी बेपत्ता तरुणींची संख्या आहे. या सर्व बेपत्ता तरुणी १६ ते २५ वयोगटातील आहेत.

## ..तर अपात्रतेसंदर्भात निर्णय ..

अध्यक्षांनी १५ दिवसांच्या आत निर्णय घ्यावा, या ठाकरे गटाच्या नेत्यांच्या मागणीबाबत विचारलं असता राहुल नार्वेकर म्हणाले, मागण्या सर्वजण करत असतात. पण कायद्यानुसार काही तरतुदी आहेत, इतरही काही कायदेशीर बाबी पूर्ण करायच्या आहेत. ही सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच निर्णय घेतला जाईल. आपल्याला निर्णय घेण्यासाठी घाई करायची नाही आणि विलंबही करायचा नाही. जो निर्णय होईल, तो निर्णय संविधानातील तरतुदी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घेतला जाईल. सभागृहाच्या बाहेर केलेल्या भाष्यांवर मी टिप्पणी करत नाही. मला तशी टिप्पणी करायची गरजही नाही. त्यामुळे कुणी १५ दिवस, कुणी २० दिवस तर काहींनी दोन महिन्यांच्या आत निर्णय घेण्याची मागणी केली आहे. पण मी याकडे लक्ष देत नाही. मी कायद्यातील तरतुदींनुसार निर्णय घेणार. कुणाच्या मनासारखं व्हावं म्हणून मी निर्णय घेणार नाही. १५ दिवसांत प्रक्रिया पूर्ण झाली तर १५ दिवसांत निर्णय घेऊ आणि प्रक्रिया पूर्ण करण्यास विलंब लागला, तर निर्णय घेण्यास विलंब होईल. कुणाचा आरोपांना घाबरून मी निर्णय घेत नाही, अशी प्रतिक्रिया राहुल नार्वेकर यांनी दिली.

# बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्यांना अजामीनपात्र गुन्ह्याच्या कक्षेत आणणार

### कायद्यातील सुधारणेचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवावा; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

मुंबई : विना परवाना तसेच मद्यसेवन करून बेदरकारपणे वाहन चालविणाऱ्या सार्वजनिक वाहन सेवेच्या चालकांविरुद्ध अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यासंदर्भात आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. हिमाचल प्रदेशच्या धर्तीवर यासंदर्भातील कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाला पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले. वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे प्रवाशांना जीव गमवावा लागू नये यासाठी कडक कायदेशीर कारवाई आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस पोलिस महासंचालक रजनीश सेठ, गृह विभागाचे प्रधान सचिव, अपर पोलिस महासंचालक वाहतूक रविंद्र सिंघल, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार आदी यावेळी उपस्थित होते.

बेदरकारपणे तसेच मद्य सेवन करून निष्काळजीपणे वाहन चालविण्यामुळे अपघात आणि त्यामुळे निष्पाप प्रवाशांचा मृत्यू यांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. २०२१ मध्ये अतिवेगाने वाहन चालविल्यामुळे झालेल्या अपघातांची संख्या २० हजार ८६० आहे तर त्यात ९८२९ जणांचा मृत्यू झाला आहे.

गृह विभागाच्या यासंदर्भात सार्वजनिक रस्त्यांवर बेदरकारपणे वाहन चालविणे हा अजामीनपात्र गुन्हा



करण्याबाबतच्या प्रस्तावावर या बैठकीत चर्चा झाली. सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या वाहनांवरील वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे होणारे अपघात आणि त्यात प्रवाशांचा होणारा मृत्यू यासाठी वाहनाचालकांविरुद्ध प्रभावी कारवाई होण्यासाठी कडक कारवाई होणे अपेक्षित आहे. त्यासाठी यासंदर्भातील कायद्यात सुधारणा करावी. विनापरवाना वाहन चालविणारे तसेच मद्यपी वाहनचालकांना त्याच्या कक्षेत आणावे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग यावरील अपघात रोखण्यासाठी सुरू असलेल्या उपायोजनांची माहिती घेतली. मुंबई- पुणे महामार्गावर असलेल्या उतारावरील ठिकाणी अपघात टाळण्यासाठी सूचना फलकांसोबतच रंब्लर बसविणे यासारख्या उपाययोजना तातडीने हाती घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ‘शासन आपल्या दारी’ उपक्रमाअंतर्गत भोर येथे २४ मे रोजी मेळाव्याचे आयोजन

## अधिकाधिक नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

पुणे : ’शासन आपल्या दारी’ उपक्रमाअंतर्गत भोर तालुक्यातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी २४ मे रोजी सकाळी ११ वाजता गंगोत्री हॉल, भोर येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यामध्ये जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले रहिवास दाखले, अधिवास प्रमापणत्र इत्यादी विविध प्रकारचे दाखले वाटप करणे, ७/१२ व फेरफार वाटप करणे,

पोटखराब वर्ग-अ लागवडीखाली आणणेबाबतचे कामकाज, लागवडीखाली आणलेल्या पोटखराब क्षेत्राच्या गटांचे ७/१२ वितरण करणे, नवीन व दुबार शिधा पत्रिकाचे कामकाज, शिधा पत्रिका विभक्त करणे, शिधा पत्रिकेतून नावे कमी करणे व वाढविणे याबाबतचे कामकाज, मतदार यादीशी आधार लिंक करणे, पी. एम. किसान योजनेबाबतचे कामकाज, संजय गांधी योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

या मेळाव्यापुर्वी १९ मे अखेर जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रहिवास दाखले, अधिवास प्रमाणपत्र इत्यादी विविध प्रकारचे दाखल्यांबाबतचे अर्ज भागनिहाय नियुक्त केलेल्या महा ई-सेवा व सेतू केंद्रांमध्ये संबंधितांकडून जमा करण्यात येणार आहे. महा ई-सेवा व सेतू केंद्रांकडून प्राप्त अर्जाची छानंनी करून दाखले तयार करण्यात येणार आहे.

सदरचे दाखले मेळाव्याच्या दिवशी वितरण केले जाणार आहे. पोटखराब वर्ग-अ लागवडीखाली आणण्याबाबतचे अर्ज, नवीन व दुबार शिधा पत्रिका अर्ज, शिधा पत्रिका विभक्त करण्याबाबत अर्ज, शिधा पत्रिकेतून नावे कमी करणे व वाढविणे याबाबतचे अर्ज मतदार यादीशी आधार लिंक करणेसाठी आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून घेणे,

पी.एम. किसान योजनेबाबतचे अर्ज संजय गांधी योजनेबाबतचे अर्ज सदर कालावधीत अर्जदार, लाभार्थी हे संबंधित गावचे तलाठी यांच्याकडे व तलाठी अर्जाची छाननी करुन दररोज असे अर्ज तहसिल कार्यालयातील संबंधित शाखेकडे सुपूर्द करतील.

या प्रक्रियेअंतर्गत १९ मे अखेर प्राप्त अर्जात त्रुटी असल्यास त्याची मेळाव्याच्या दिवशी पुर्तता करावी. १९ मे पर्यंत अर्ज सादर करता आले नाही अशा लाभार्थ्याचे अर्ज मेळाव्याच्या दिवशीदेखील स्विकारण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

या मेळाव्यात तालुक्यातील पंचायत समिती, कृषी विभाग, विज वितरण विभाग, वन विभाग, बांधकाम विभाग, भूमि अभिलेख विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, सहकार विभाग, पोलीस विभाग, नगरविकास विभाग, पशुसंवर्धन विभाग, पाटबंधारे विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, एसटी महामंडळ इत्यादी विविध विभागांकडील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करणेची कार्यवाही करण्यात येणार आहे. या मेळाव्यामध्ये भोर तालुक्यातील अधिकाधिक नागरीकांनी सहभागी होऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भोरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे यांनी केले आहे.

# विज्ञान, तंत्रज्ञान आणि नविनता यांचे सांगड घालून, अन्नछत्र मंडळ परिसराच्या विकास होत आहे : उषा नाडकर्णी

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासकडून विज्ञान, तंत्रज्ञान आणि नविनता यांचे सांगड घालून, अन्नछत्र मंडळ परिसराच्या विकास होत असल्याचे मनोगत जेष्ट मराठी कलाकार उषा नाडकर्णी यांनी व्यक्त केल्या.

त्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी न्यासाचे एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# अन्नछत्र मंडळाचे नांव देश-विदेशात नांव लौकिक : प्रयाग लांडे



अक्कलकोट/प्रतिनिधी :श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले स्वामी कार्याने अन्नछत्र मंडळाचे नांव देश-विदेशात नांव लौकिक होत असल्याचे मनोगत चांदीवली मुंबईच्या आमदार दिलीपराव लांडे यांचे सुपुत्र प्रयाग लांडे यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# युवकांनी नोकरी देणारे व्हावे : आ.सुभाष देशमुख

## छत्रपती शाहु महाराज युवा शक्ती करियर व मार्गदर्शन शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




सोलापूर/प्रतिनिधी : स्वतःमधील क्षमता जाणून घेऊन, त्या विकसित करण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करा. या प्रयत्नांमध्ये स्वतःमधील उणिवांचा अडथळा होवू देवू नका, असे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी आज येथे केले. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने आयोजित छत्रपती शाहु महाराज युवा शक्ती करियर व मार्गदर्शन शिबिराच्या उदघाटन सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे होते.यावेळी नोकरीच्या मागे न लागता विविध व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करुन नोकरी देणारे बना, असा सल्ला श्री. देशमुख यांनी दिला, तर व्यावसायिक नैतिकता व सामाजिक जाणीव जोपासण्याचे आवाहन श्री. ठोंबरे यांनी केले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने विजापूर रोड स्थित गंगा लॉन्स येथे घेण्यात आलेल्या या एक दिवसीय शिबिरात प्रा. आय. आय. मुजावर, प्रा. ए. आय. यत्नाळ, प्रा. बी. जे. पाटील यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या शिबिरात विद्यालयीन अभ्यासक्रम / प्रवेश प्रक्रिया / कलमापन चाचणी /शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना विषयक माहिती / करियर प्रदर्शन याबाबत मार्गदर्शन करून उपयुक्त माहिती देण्यात आली. या शिबिरादरम्यान विविध शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, अर्थसहाय्य करणाऱ्या विविध संस्थांनी माहिती देणारे स्टॉल्स उभारलेले होते. या स्टॉल्सना उपस्थित विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रास्ताविक जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस. आर. भालचिम यांनी तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था विजापूर रोड सोलापूरचे प्राचार्य एम. एस. उडाणशिवे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य, ए. के. जाधव यांच्यासोबत संस्थेतील सर्व गटनिदेशक, निदेशक व सर्व कर्मचारी वृंद यानी विशेष प्रयत्न केले. रादरच्या कार्यक्रमास १० वी / १२ वी उत्तीर्ण उमेदवार व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासन आपल्या दारीकार्यक्रमांतर्गत ऑनलाईन रोजगार मेळावा

सोलापूर/प्रतिनिधी : शासन आपल्या दारीया कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी दिनांक १८ मे २०२३ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि मॉडेल करिअर सेंटर, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हा ऑनलाईन रोजगार हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.या रोजगार मेळाव्यात दहावी, बारावी, आय. टी. आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, ऑफिस असिस्टंट. कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशियन, मशिन ऑपरेटर अशा प्रकारची एकूण ८०० पेक्षा जास्त रिक्त पदे ९ उद्योजकांनी ऑनलाईन अधिसूचित केलेली आहेत.नोकरी इच्छुक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्त पदांसाठी ऑनलाईन ॲप्लाय करावे, जेणेकरून त्यांना मेळाव्यात सहभागी होता येईल. याबाबत काही अडचण आल्यास कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यातयेतआहे.

# विजयराव काळे पाटील यांच्या नेतृत्वात कोल्हर येथील असंख्य महिलांचा शिवसेना पक्षामध्ये प्रवेश



शिर्डी : मा श्री खासदार शिर्डी लोकसभा सदाशिव लोखंडे साहेब यांच्या हस्ते व मार्गदर्शनाने शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख विमलताई पुंडे ,जिल्हा प्रमुख श्री कमलाकरजी कोते पा जिल्हा संघटक विजयराव काळे पा , सौ वनिता जितेंद्र जाधव तालुका संघटक यांच्या सहकार्याने उत्तर नगर जिल्हा शिवसेना उपजिल्हाप्रमुख म्हणून सौ सुनीता पंडितराव शेळके पा तसेच कोल्हार शहर प्रमुख पदी सौ अर्चनाताई निबें यांची निवड करण्यात आली त्यावेळी असंख्य महिलानी शिवसेनेत प्रवेश केला. सुप्रिया शेळके : शितल घोरपडे . निता घोडे . वर्षा वाडगे . शोभा लोखंडे . पुजा समवंशी . मिनाज शेख . अश्वीनी वाडगे . वैशाली वाळके . रंजना धट . श्रुती शेळके . मानसी निबे . मिना लोंढेममता बोरेडे सारीका रोकडे महिलानी प्रवेश केलाश्रावणी लोंढे नवनियुक्त महिला पदाधिकारी व सर्व महिला कार्यकर्ता याचं हार्दिक अभिनंदन

# पंचमुखी परमेश्वर शिवलिंगास आम्रफलार्चन पूजा


सोलापूर/प्रतिनिधीः काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रथम पट्टाभिषेक सोहळ्यास एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भक्तांच्यावतीने अक्कलकोट रस्त्यावरील पंचमुखी परमेश्वर शिवलिंगास आम्रफलार्चन पूजा करण्यात आली. यावेळी होटगी मठातील चारशे जंगम बटूंकडून रुद्राभिषेक करण्यात आला. या कार्यक्रमास काशी जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजींचे दिव्य सान्निध्य लाभले. पूजेचे पौरोहित्य परमेश्वर हल्लाळी यांनी केले. यावेळी बृहन्मठ होटगी संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे, प्राचार्य राजशेखर हिरेमठ यांच्यासह सिध्दलिंगप्पा कोठाणे, शंभुलिंग कोठाणे, केदारनाथ कोठाणे, रामेश्वर कोठाणे, मल्लिनाथ मोकाशी, सुधीर माळगे, सचिन सद्दू, गणपती होनमुर्गीकर, नीलकंठ पाटील आदी भक्तगण उपस्थित होते. महापूजेनंतर चारशे बटूंसाठी आमरस पुरणपोळी प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# अभिजीत पाटील यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास केले अभिवादन



पंढरपूर/प्रतिनिधीः छत्रपती शिवजयंती निर्माण केलेल्या स्वराज्याचे प्राणपणाने रक्षण करणारे अतुलनीय धैर्य आणि शौर्याचे प्रतीक स्वराज्याचे द्वितीय छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्रिवार मानाचा मुजरा केला स्वराज्याच्या रक्षणासाठी आणि विस्तारासाठी छत्रपती शिवरायांचे विचार नैतिकतेला समृद्ध करणारे छत्रपती शंभुराजे यांच्या कार्याचा आणि स्वराज्य निष्ठेच्या इतिहासाला आपणास सदैव प्रेरणा देत राहील सदर प्रसंगी शिवसेना तालुकाध्यक्ष संजय घोडके राष्ट्रवादीचे संदीप मांडवे बंटी वाघ चव्हाण , सागर चव्हाण,इत्यादी उपस्थित होते

## शब्दकोडे क्र १३५



आडवे शब्द १. वस्त्र ३. त्याप्रमाणे ५. अशा माणसाकडे काहीही काम सोपवू नये ११. निश्चय १२. डोळ्याच्या उघड्या पृष्ठभागावरील पारदर्शक आवरण १४. पुन्हा १५. कधीही पोळे न सोडणारी १६. मुक्काम १८. ओसाड, वैराण १९. पौर्णिमा २०. लेखणीचा आधुनिक प्रकार २१. वेल २३. साडीच्या खालच्या भागाला लावलेली अस्तराची किनार २४. बाव, झावळीच्या पातीमधील काडी २५. सूर्यास्ताआधी २७. लक्ष - पण भान नाही २९. तोरा ३२. आवरण ३५. पदवी ३६. सूट ३७. सर्वात लहान ३९. सर्वात मिळून, सर्वांचे ४०. अपुरा ४२. रोटीचा प्रकार ४३. गोष्ट ४४. तीव्र लोभ ४५. सत्तेवर आलेला ४८. आर्जवे ५०. भित्रा ५२. डुक्कर ५४. दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ५६. चांदी ५८. सैनिक ६०. सुळका ६१. पृथ्वी ६३. व्यायामप्रकार, अवघड कामगिरी ६४. शहाणपण यावर अवलंबून नसते ६६. लिंबाची निरूपयोगी जात ६७. एकाच वेळी, अचानक ६९. अंत:करण ७१. शेवट ७३. जोग धबधबा या नदीवर (कर्नाटक) आहे ७४. सहजगत्या ७६. वेग ७९. हक्क सांगणे ८१. प्रमाद ८३. लहान मुलाची तुमान ८४. गुंड ८५. टेंभा ८७. बंदुकीने केलेला हल्ला ९१. चोप ९३. इंद्राची पत्नी ९४. सावध ९७. स्वच्छ ९८. ऋण ९९. अंदाज १००. एक शेंगभाजी १०२. गंध, परिमल १०४. टिंगल १०५. राजस्थानी स्त्रियांच्या पेहरावातील नक्षीचा घोळदार परकर १०६. घाणेरडे १०७. टोकदार १०८. श्रम १०९. ऋषी

उभे शब्द १. स्थापनादिवस २. हा प्राणी स्वत:चा रंग बदलू शकतो ३. पोहण्यासाठी बांधलेला तलाव ४. सर्प ५. शंकराचे प्रिय फळ ६. पूर्वज ७. माळजमीन ८. दंत ९. ’अपराध मीच केला, शिक्षा तुझ्या कपाळी.....’ १०. विलंब, दिरंगाई १३. डोक्याचा केस गळून गेलेला भाग १५. जंगल १७. दूरचा फेरा ह्व बहुदा उगाच पडणारा १९. रोमांच २२. लकेर २६. विधानातील स्पष्ट विसंगती २८. आजीच्या जमान्यातील बिनविजेचा मिक्सर-ग्राईंडर! ३०. परिमार्जन ३१. अतिशय हानिकारक ३३. व्रत ३४. कमळ, मुलाचे एक नाव ३५. सज्जन ३६. डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन ३८. राजवाडा ४१. कौशल्य ४२. स्त्री ४५. प्रारब्धदेवता ४६. प्रवाह ४७. तुरूंग ४८. कुरळे केस ४९. अभिमानास्पद ५१. फुलातील पराग ५२. साबुदाण्याचा तळीव पदार्थ ५३. आक्षेप ५५. श्रीकृष्णाच्या जीवावर उठलेली मावशी ५७. युद्धातील यश ५९. गुडघ्यापासून घोट्यापर्यंतचे हाड ६०. मान्य ६२. हाक ६५. कलिका ६८. चिलट ६९. तनू ७०. सर्वांना ठाऊक झालेले ७२. जर, जेव्हा ७५. स्थूल ७७. किनारा ७८. किरकोळ, फालतू ८०. डावा ८१. शेगडी ८२. ताकद ८६. विज्ञान ८७. अडचण ८८. बडबडगीतांची शाळा ८९. मृदंग ९०. शर्विलक ९१. मत्स्य ९२. स्वातंत्र्य ९३. साखर ९५. सार्वजनिक वाहतुकीचे अवजड वाहन ९६. मोठी सुई ९९. सुदृढ, मजबूत १००. निवृत्तीनाथांचे गुरु, नऊ नाथांपैकी एक १०१. कुमक १०३. पूर्व दिशा



डोंबिवली बदलापूरकरांची भक्तिमय शताब्दी

# वटवृक्ष मंदिरात शताब्दी महोत्सवी मासिक किर्तन सेवा स्वामी चरणी अर्पण

## महेश इंगळेंच्या हस्ते शताब्दी महोत्सवाचे दीप प्रज्वलन

अक्कलकोट/प्रतिनिधी: डोंबिवली बदलापूर येथील स्वामीभक्त मंडळींच्या वतीने श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात भक्तिमय शताब्दी धार्मिक कार्यक्रमांचा शुभारंभ मोठ्या थाटात व भक्तीमय वातावरणात पार पडला. वटवृक्ष मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे व प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करण्यात आले. डोंबीवलीतील स्वामी भक्त सद्गुरु चैतन्यस्वरूप अण्णा लिमये यांच्या श्री स्वामी समर्थ नामाचा प्रचार आणि प्रसार या कार्याअंतर्गत जप, नामस्मरण, किर्तन भजन, गायन या सेवेत, अध्यात्मिक उन्नती सोबत स्वामीसेवकांसाठी मनोरंजनाचे हक्काचे व्यासपीठ हे ध्येय समोर ठेवून अक्कलकोट मासिक किर्तन सेवेचे आयोजन डोंबिवली बदलापूर स्वामी भक्त मंडळींचे अध्यक्ष सोमदत्त आसोलकर हे श्री वटवृक्ष देवस्थान अक्कलकोटचे अध्यक्ष सन्माननीय महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करत आले आहेत. पुर्वजन्माचे काहीतरी ऋणानुबंध आणि स्वामी महाराजांचा आशीर्वाद असल्यानेच हे सेवा यज्ञकुंड सतत धगधगत आहे. अक्कलकोट स्वामींच्या कालच्या १०० व्या मासिक सेवेदरम्यान स्वामी चरित्र सारामृत अध्याय २१ वर आधारित गाण्यांचा कार्यक्रम श्री किरण फाटक आणि अपुर्व गोखले यांनी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या ज्योतिबा मंडप येथे सादर केला तसेच या मासिक मे महिन्याचा जप, नामस्मरण, मानसपूजा आणि १०० वी मासिक किर्तन सेवा ही.भ.प.श्री.सुधीर बाळ बुवा यांनी स्वामींचरणी अर्पण केली. श्री स्वामी चरित्र सारामृत अध्याय २१ या ग्रंथाचे पारायण श्रीमंत मृदुलाराजे भोसले मुरलीधर मंदिर, अक्कलकोट येथे संपन्न झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, चंद्रकांत ठाकूर संस्थापक डोंबिवली बदलापूर स्वामीभक्त मंडळी, नित्यानंद घाटे अध्यक्ष श्री स्वामी समर्थ सेवा मंडळ डोंबिवली व ह.भ.प. सुधीर बाळ बुवा हे उपस्थित होते.

मानसपुजेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष रहाटे तर शताब्दी महोत्सव कार्यक्रमाच आयोजन भरत डिंगोरकर यांनी केले होते. या कार्यक्रमात त्यांना तबल्यावर सुनील शेलार सर व हार्मोनियम वर मयूर स्वामी, अक्कलकोट व छाया गद्रे यांनी किर्तनकारांना उत्तम साथसंगत केली.

या कार्यक्रमास श्रोत्यांनीही मोठी गर्दी केली होती. याप्रसंगी मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, संजय पाठक, आत्माराम तायशेटे, संतोष वाघमोडे, स्वामीनाथ लोणारी, रविराव महिंद्रकर, काशिनाथ इंडे, चंद्रकांत ठाकूर मामा व डोंबीवली बदलापूर स्वामी भक्त मंडळी उपस्थित होते.

# मुंबईसह रखडलेल्या महापालिका निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होऊ शकतात; देवेंद्र फडणवीसांचे संकेत

पुणे : राज्यातील रखडलेल्या महापालिका निवडणुका या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होऊ शकतात असं महत्त्वपूर्ण वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. पुणे भाजपचे शहराध्यक्ष जगदिश मुळीक यांच्या एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. हा प्रश्न सध्या न्यायालयात असल्याने देवेंद्र फडणीसांनी केलेल्या या वक्तव्यावरुन राज्य शासनाही भूमिकाही काहीशी स्पष्ट होतेय असं म्हटलं जातंय.

गेल्या दीड वर्षांपासून महापालिका निवडणुका घेण्यात आल्या नाहीत.

त्या ठिकाणी प्रशासक नेमण्यात आले आहेत.

वॉर्ड पुनर्रचनेप्रकरणी शिवसेना ठाकरे गट सर्वोच्च न्यायालयात

मुंबई महापालिका वॉर्ड पुनर्रचना प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाची सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर या आठवड्यात सुनावणीची शक्यता आहे.

हायकोर्टाने शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक राजू पेडणेकर आणि समीर देसाई यांची याचिका फेटाळल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिकेच्या वॉर्डची संख्या राज्य सरकारने२३६ वरून २२७ केल्याने शिवसेना ठाकरे हायकोर्टात याचिका दाखल केली होती.

राज्यातील अनेक नगर परिषदांमध्ये नगरसेवकांची संख्या वाढवलेली कायम ठेवलेली असताना फक्त मुंबई महापालिकेतील नगरसेवकांची संख्या कमी करण्याचा राज्य सरकारचा निर्णय दुजाभाव करणारा असल्याचा शिवसेना ठाकरे गटाचा आरोप आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील वाद हा सर्वोच्च न्यायालयात असून त्याची सुनावणी सातत्यानं लांबणीवर जात आहे. या प्रकरणावरील शेवटचा निर्णय सुप्रीम कोर्टानं यापूर्वी २८ जुलै २०२२ रोजी दिला होता. याच सुनावणीत सुप्रीम कोर्टानं ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला परवानगी देण्यात आली होती. पण त्यानंतर ९२ नगरपरिषदांचा प्रश्न कोर्टात प्रलंबित होता. त्यानंतर राज्यात सत्तांतर झालं. नवं सरकार स्थापन झाल्यानंतर ४ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणुका आणि प्रभाग रचना यासंदर्भातील नवा अध्यादेश काढण्यात आला, त्यानंतर हा मुद्दा सुप्रीम कोर्टात पोहोचला.

सत्तांतर झाले आणि निवडणुका लांबणीवर पडल्या

मे महिन्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची सूचना केली होती. कुठल्याही परिस्थितीत निवडणुका घ्या, असं



सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. परंतु त्यानंतर राज्यात सत्तांतर झालं आणि शिंदे-फडणवीस सरकारने वॉर्ड रचना पुन्हा नव्याने करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या. महाविकास आघाडी सरकारने मुंबई महानगरपालिकेमध्ये एक सदस्यीय प्रभाग आणि इतर महापालिकांमध्ये तीन सदस्यांचा प्रभाग केला होता. त्यानंतर शिंदे सरकारने २०१७ प्रमाणे चारचा प्रभाग करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला महाविकास आघाडीने जोरदार विरोध केला होता.

# बोगस बियाणे विक्रीला पायबंद घालावा : ना.गिरीष महाजन



धुळे : पिकाची उत्पादकता वाढण्यासाठी शेतकऱ्यांना पीक लागवडीबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच जिल्ह्यात कुठेही बोगस बियाणे विक्री होणार नाही याची दक्षता कृषि विभागाने घ्यावी. असे निर्देश राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात खरीप पूर्व हंगाम आढावा बैठक पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृष्यप्रणालीद्वारे संपन्न झाली यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पवार, आमदार जयकुमार रावल (ऑनलाईन) आमदार मंजुळाताई गावीत, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, सभापती संजीवनी सिसोदे (ऑनलाईन) अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कुरबान तडवी, उपनिबंधक सहकार मनोज चौधरी यांचेसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री पुढे म्हणाले की, शेतकरी बांधवांचा खरीप हंगाम सुकर होण्यासाठी त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व बाबीं मुबलक प्रमाणात उपलब्ध असणे आवश्यक आहे

. याकरिता सर्व संबंधित विभागांनी आवश्यक नियोजन करावे. शेतकरी बांधवांना आवश्यक असणारे खरीप पीककर्ज वेळेत वितरीत करण्यात यावे. पीककर्जासाठी शेतकऱ्यांची अडवणूक होणार नाही याची दक्षता बॅकांनी घ्यावी. ज्या बँका पीक कर्जासाठी शेतकऱ्यांची अडवणूक करतील त्यांचेवर गुन्हे दाखल करावे. जिल्ह्यातील पीक लागवड लक्षात घेऊन आवश्यक ते बी-बियाणे, खते व कृषि निविष्ठा मुबलक उपलब्ध ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिलेत. बी-बियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही तसेच जिल्ह्यात कुठेही बोगस बियाणे व खते विक्री होणार नाही. यासाठी कृषि विभागाने खते व बियाणे विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करावी. शेतकऱ्यांना मागणीनुसार खते व बियाणांचा पुरवठा होणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण म्हणून शेतकऱ्यांना पीक विम्याबाबत मार्गदर्शन करावे. शिवाय शेतकऱ्यांच्या लाभाच्या विविध योजना शासन राबवित आहेत.

या योजनांची माहिती शेतकऱ्यांना द्यावा. जिल्ह्यात फळबाग लागवड वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. यास अनुसरुन जिल्ह्यात तृणधान्याचे लागवड क्षेत्र वाढण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याचीही सूचना केली.

जिल्ह्यात खरीप हंगाम लागवडीचे क्षेत्र ३ लाख ८४ हजार १५९ हेक्टर इतके आहेत. यात सर्वाधिक क्षेत्र कापसाचे असून त्यानंतर मका, बाजरी, सोयाबीन, ज्वारीचे क्षेत्र आहे.कापूस लागवडीसाठी १० लाख ३० हजार ६४० बीटी कापूस बियाणे पाकीटांची आवश्यकता आहे. तर यावर्षीसाठी ९४ हजार ३८० मे. टन खतांचे आवंटन मंजूर असून ४७ हजार ४७२ मे. टन खताचा साठा शिल्लक आहे. जिल्हास्तरावर एक तर तालुकास्तरावर प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण पाच गुणनियंत्रण भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. जिल्ह्यात बी-बियाणे व खतांची कमतरता भासणार नाही अशी माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. तडवी यांनी बैठकीत दिली. या बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी विविध मौलिक सूचना केल्या. त्यावर आवश्यक कार्यवाहीच्या सूचना पालकमंत्र्यांनी संबधित यंत्रणेला दिल्या.

# दिल्लीत छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी!

नवी दिल्ली : छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती रविवारी सायंकाळी महाराष्ट्र सदनात उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांचे आयोजन छत्रपती संभाजी महाराज जयंती महोत्सव समिती २०२३ दिल्ली यांच्यावतीने करण्यात आले. विचारमंचावर लाखोजी जाधवराव यांचे वंशज शिवाजीराव जाधवराव, संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण, अध्यक्ष विलासभाऊ पांगारकर, विजय काकडे, विधीज्ञ राज पाटील, बडोदा घराण्याचे राजे शिर्के, प्रदीप साळुंखे उपस्थित होते.मार्गदर्शनपर भाषणात प्रमुख पाहुणे लाखोजी जाधवराव यांचे वंशज शिवाजीराव जाधवराव यांनी इतिहासकालीन अनेक पैलूंचा उलगडा केला. माँ जिजाऊ यांच्या दैदिप्यमान कर्तृत्वाचा पाढा वाचताना विदर्भ - मराठवाडा- पश्चिम महाराष्ट्र - कोकण व दक्षिण भारत हे कार्यक्षेत्र कसे होते याबद्दल त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विलासभाऊ पांगारकर म्हणाले, आमच्या समितीची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत असून राष्ट्रीय स्तरावर छत्रपती संभाजी महाराज यांचा स्वराज्य निर्मितीचा अखंड तळपणारा दीपक देशभरातील शालेय स्तरावर पोहचावा म्हणून केंद्र शासनातर्फे सुद्धा विशेष उपक्रम राबविला गेला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रख्यात वक्ते प्रा. प्रदीप साळुंके म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांनी सोळाव्या वर्षी लिहिलेले महत्त्वपूर्ण ग्रंथ आणि त्यातून मांडलेली स्वराज्याची संकल्पना अत्यंत महत्त्वाची असून त्या मधून



प्राप्त संदेशच खरी एकात्मतेची हाक देणार असून अठरा पगड जातींच्या मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्य रक्षणार्थ आपले आयुष्य वेचले. म्हणी वाक्यप्रचारातून त्यांनी आजच्या परिस्थितीवरही बोट ठेवले. छत्रपती संभाजी महाराजांनी त्यांच्या आयुष्यात कधी हार मानली नाही तोच संदेश त्यांच्या मावळ्यांनी घ्यावा, असे त्यांनी यावेळी आवाहन केले.

विजय काकडे, कमलेश पाटील, इंजि.तानाजी हुस्सेकर, विधीज्ञ राज पाटील, बडोदा घराण्याचे राजे शिर्के यांचीही प्रबोधनपर भाषणे झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण म्हणाले, शासनातर्फे साजरे करण्यात येणारे राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती कार्यक्रमाच्या यादीमध्ये १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती म्हणून समाविष्ट केल्यामुळे राज्य शासनाचे आभार व्यक्त केले.

राष्ट्रीय स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करावी. यासह मराठा टुरिझम नावाने शिवरायांचा भौगोलिक इतिहास जोडणारा प्रकल्प केंद्र सरकारने हाती घ्यावा, अशीही मागणी त्यांनी यावेळी केली.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समिती कार्याध्यक्ष राजेंद्र दाते पाटील यांनी केले.

समितीचे उपाध्यक्ष प्रा.डॉ.राजाराम दमगीर यांनी आभार व्यक्त केले.कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्र सदन येथे असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यासह या परिसरात असणाऱ्या महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सदनाच्या आतील भागात असणाऱ्या छत्रपती शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# आयुक्तांना मारहाण प्रकरणी राष्ट्रवादीचे चार कार्यकर्ते तडीपार, जितेंद्र आव्हाडांच्या पीएवरही कारवाई

ठाणे : राष्ट्रवादीचे माजी मंत्री व आमदार जितेंद्र आव्हाड यांची एक वादग्रस्त कौटुंबिक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या प्रकरणी संतप्त राष्ट्रवादीच्या चार कार्यकर्त्यांनी सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांचा निषेध नोंदवून ठाणे पालिकेच्या मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर मारहाण केली होती. आता या राष्ट्रवादीच्या चार कार्यकर्त्यांवर नौपाडा पोलिसांनी तडीपारीची कारवाई केली आहे. अभिजित पवार, हेमंत वाणी, विक्रम खामकर आणि विशांत गायकवाड, असे या ४ कार्यकर्त्यांची नावे आहेत.काय म्हणाले जितेंद्र आव्हाड? :

देशामधे सध्या सुडाचे राजकारण चालू आहे. त्यांच्यावर राजकीय गुन्हे असताना त्यांना तडीपार करणे हे द्वेषाचे राजकारण आहे. माझ्या कार्यकर्त्यांना त्रास देणे म्हणजे मला त्रास देणे आहे. ३५ वर्षाच्या राजकारणात मी कोणालाही फसवले नाही. माझ्यासोबत वाद घालायचा असेल तर समोर या. माझ्यावरील खटल्यातील एका आरोपीला फितवून माफीचा साक्षीदार केलं आहे. माझा नागडा फोटो टाकायचा, आई, बहीण आणि मुली बद्दल बोलायचं, सातत्याने ४ वर्ष आमच्या मागे लागायचं आणि आमच्या एका कार्यकर्त्याने झापड लावली तर मुख्यमंत्र्यांकडून सिपी पर्यंत सर्व कामाला लागले. आम्हाला इज्जत नाही का? कर्नाटक तो झाकी है महाराष्ट्र अभी बाकी है. तुम्ही जेवढे सुडाचे राजकारण कराल तेवढेच मतदार तुम्हाला खाली खेचतील.

आरोपींना दोन वर्षांसाठी हद्दपार केले : या कार्यकर्त्यांनी १५ फेब्रुवारी रोजी ठाणे पालिकेचे सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांच्यावर जीवघेणा हल्ला केला होता. या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर न्यायालयाने चौघांना पोलीस कोठडी आणि नंतर न्यायालयीन कोठडी सुनावली होती. सदर प्रकरणी कायदा आणि सुव्यवस्थेचा विचार करून नौपाडा पोलिसांनी चारही आरोपींच्या तडीपारीची कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठांना देत वरिष्ठांनी त्यांना ठाणे जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातून दोन वर्ष हद्दपार केले आहे. या चारही जणांना जिल्ह्याच्या बाहेर सोडण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# सीबीआयने सुमारे १०१७.९३ कोटी रुपयांच्या बँक घोटाळा प्रकरणी सात आरोपींविरुद्ध केला गुन्हा दाखल; नऊ ठिकाणी छापे टाकले

मुंबई : केंद्रीय अन्वेषण विभागाने ११.०५.२०२३ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या तक्रारीवरून रायगड (महाराष्ट्र) येथील खाजगी कंपनी, तिचे संचालक हमीदार तसेच मुंबई स्थित एक खाजगी कंपनी आणि अज्ञात सरकारी कर्मचारी तसेच अज्ञात व्यक्तींविरोधात स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर पाच कन्सोर्टियम सदस्य बँकांचे १०१७.९३ कोटी रुपयांचे (अंदाजे) नुकसान केल्याच्या आरोपावरून गुन्हा नोंदवला आहे. आरोपींनी २०१२ ते २०१७ या कालावधीत सुमारे ८१२.०७ कोटी रुपये इतके खेळते भांडवल, मुदत कर्ज आणि एनएफबीचा लाभ घेऊन स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर ५ कन्सोर्टियम सदस्य बँका म्हणजेच बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, पंजाब नॅशनल बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांची फसवणूक करण्याचा कट रचला. तसेच आरोपींनी कट रचून एसबीआय आणि इतर ५ कन्सोर्टियम सदस्य बँकांना काल्पनिक विक्री खरेदी व्यवहार करून फसवले तसेच खात्यांमध्ये गैरव्यवहार केले आणि थकित कर्जाचा भरणा न केल्याने सुमारे १०१७.९३ कोटी रुपये (अंदाजे) निधी देखील लुटला, असा आरोपही करण्यात आला. या प्रकरणी दिल्ली, मुंबई, रायगड आणि ठाणे (महाराष्ट्र) यासह ९ ठिकाणी आरोपींच्या निवासस्थानी आणि अधिकृत जागेवर छापे टाकण्यात आले आणि दोषी दस्तावेज सामग्री जप्त करण्यात आली.या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.कृपया सीबीआय वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या BS&FB, CBI, _w§~B©À`m FIR/ RC 0772023B©0005 दिनांक ११.०५.२०२३ मधील आरोपींच्या नावांसह अधिक तपशील पहा.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्काराचे ३१ मे रोजी वितरण : महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई : महिला व बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या महिलांना प्रोत्साहन मिळावे याकरिता पुण्योक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. राज्यातील ग्रामपंचायत व गट ग्रामपंचायत क्षेत्रातील दोन कर्तबगार महिलांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात येणार असून ३१ मे रोजी पुण्योक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त हे पुरस्कार वितरण करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

महिला व बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या महिलांना आपल्या कार्यअहवालासह शनिवार दि. २० मे पर्यंत अर्ज स्थानिक ग्रामपंचायतीमध्ये करावयाचा आहे. या पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या महिलांनी बालविवाह प्रतिबंध, हुंडा निमुर्लन, लिंग चिकित्सा प्रतिबंध, घरगुती हिंसा प्रतिबंध, महिला सक्षमीकरण, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, आरोग्य, साक्षरता, मुलींच्या शिक्षणासाठी पुढाकार यासारख्या क्षेत्रात उत्स्फुर्तपणे सहभाग घेतलेला असावा.

पुरस्कार निवडीसाठी जिल्हास्तरावर जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी व महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी यांनी समन्वयाने जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये हा उपक्रम योग्य पदधतीने राबविण्याची दक्षता घ्यावी, तालुकास्तरावर बालविकास प्रकल्प अधिकारी व संरक्षण अधिकारी यांनी समन्वयाने तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये हा उपक्रम राबवावा. ग्रामपंचायत स्तरावर दोन कर्तबगार महिलांची निवड करण्यासाठी संबधित ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात येत आहे. याबाबतचाच महिला व बालविकास विभागाचा शासननिर्णय दिनांक ९ मे २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.